यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

दूरध्वनी क्रमांक - (0253) 2231714, 2231715, 2230227, 2230013 टेलिफॅक्स (0253) 2230298

जा.क्र. : परीक्षा-03/Sci.&Tech./ 538 /2018 दिनांक : 21/12/2018

प्रति,

मा.केंद्रप्रमुख/संयोजक/ शिक्षणक्रम सम न्वयक

य.च.म.मु.विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र

विषय – जानेवारी 2019 – अंतर्गत (Theory CA, Pracatical CA & UA) गुणांबाबत...

महोदय/महोदया,

आर्किटेक्चर, विज्ञान व इंजिनिअरींग शिक्षणक्रमांच्या परीक्षा 3 जानेवारी 2019 पासून सुरू होत आहेत. या सर्व शिक्षणक्रमांचे अंतर्गत (Theory CA, Pracatical CA & UA) गुण ऑनलाईन प्रक्रियेने भरावयाचे असतात. ऑनलाईन पध्दतीने अंतर्गत गुण कसे भरावयाचे असतात त्याकरीता विद्यापीठाच्या पोर्टलवरील Presentation Tab मधील अं.क्र.12-How to do mark entry हा डेमो बघावा.

अंतर्गत गुणांबाबत Continuous Assessment (CA), लेखी, प्रात्यक्षिक अंतिम व स्टुडीओ अंतिम परीक्षेच्या अंतर्गत गुणांबाबत आपणास पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

1) विभागीय केंद्राकडून मिळालेल्या अभ्यासकेंद्राच्या Login ID आणि Password देण्यात आलेला आहे त्याच Login ID आणि Password चा वापर करून अंतर्गत गुण ऑनलाईन पध्दतीने भरणे बंधनकारक आहे. Login ID आणि Password मिळालेला नसल्यास विभागीय केद्रांशी संपर्क साधावा.

2) प्रात्यक्षिक परीक्षेच्या अभ्यासक्रमनिहाय कोऱ्या उपस्थिती याद्या व गुणदान याद्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर आपल्या केंद्राच्या Login मध्ये उपलब्ध आहेत. अभ्यासकेंद्रानी सदर याद्या User ID & Password वापरून वेबसाईटवरुन डाऊनलोड करून घ्याव्यात.

3) प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी उपस्थिती यादीवर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

4) Theory, Practical CA च्या गुणदान याद्या लेखी परीक्षेपूर्वी दिनांक 24 डिसेंबर 2018 ते 8 जानेवारी 2019 आणि Practical UA च्या गुणदान याद्या दिनांक 20 फेब्रुवारी 2019 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने पाठवाव्यात. दिनांक 20 फेब्रुवारी 2019 नंतर येणाऱ्या गुणदान याद्या स्विकारल्या जाणार नाहीत त्याची सर्व जबाबदारी अभ्यासकेंद्राची असेल याची कृपया नोंद घ्यावी.

5) ऑनलाईन पध्दतीने अंतर्गत गुण भरल्यानंतर Generate Report in Pdf मध्ये जावून यादीची Print काढून ती यादी सही व शिक्क्यानिशी विद्यापीठात पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. Excel मध्ये यादी तयार करून त्यामध्ये गुणांची नोंद करून ती यादी पाठवू नये.

6) निकाल वेळेत जाहीर करण्याकरीता दिलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीनें अंतर्गत गुण भरलेले नसल्यास Absent mark करून निकाल जाहीर केला जाईल. विद्यार्थ्यांच्या निकालात गैरहजर आल्यास सर्वस्वी अभ्यासकेंद्र जबाबदार असेल. लिंक बंद झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अंतर्गत गुणांची नोंद केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

7) ऑनलाईन पध्दतीने अंतर्गत गुण भरण्यास काही अडचण येत असल्यास दूरध्वनीद्वारे अथवा markad_rb@ycmou.digitaluniversity.ac,jadhavsp@hotmail.com,ramdasi_sh@ycmou.digitaluniversity.ac, bhusaretara@gmail.com या मेल आयडीला मेल करून त्वरीत कळवावे.

सहकार्याबद्दल धन्यवाद !

26/12/18

(टी.व्ही.कुलकर्णी)

सहायक कुलसचिव,परीक्षा कक्ष-3